FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

0154139

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रकिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 37, वर्ष Year 2027, दिनांक Date 02/06/2027

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम १९८८ कलमे Sections १३(१)(ब) सह १३(२)
   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार ............, तारीख पासून 01/01/2088 ............ वेळ, तारीख पर्यंत 28/07/2024 वेळ ............
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 02/06/2027 वेळ Time 13:34 वा.
   (c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 26/2027, तारीख Date 2/6/2027 वेळ Time 16:40 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासुन अंतर व दिशा ............, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ............
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणचे नाव Address of Occurrence Name ठाणे, मुंबई, ठिकाणाचे नंबर No. if any ............, गल्ली Ward ............, रस्त्याचे नाव Name of road ............
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ............, गाव Village ............, पोस्ट Post ............, तालुका Taluka ............, जिल्हा Dist. ............, राज्य State ............
   (c) पोलीस ठाण्याचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ............, तालुका Taluka ............, जिल्हा Dist. ............, राज्य State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री सुनिल लोंढे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name ज्ञानेश्वर लोंढे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४० वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9050444444
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. —, दिल्याचा दिनांक Date of Issue ............, दिल्याचे ठिकाण Place of Issue ............, (f) व्यवसाय Occupation ............
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ............, जनजात Sub-Caste ............
   (h) पत्ता Address ............, गल्ली / सर्व्हे नं. Ward ............, घर / नाव नं. House/Name No. ............, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ............, पॅन नं. PAN No ............, वोटर्स नं. Card No. ............
   रस्त्याचे नाव Road बी. 604, [illegible] [illegible], गाव योगायो, [illegible], [illegible] नंन्ची Nearest identifiable place [illegible] Village— मुंबई Post— 400086
   तालुका Taluka ............, जिल्हा Dist. ............, राज्य State ............, सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर फेकन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   शंकर चन्नाप्पा पुजारी, धंदी-नोकरी (पोलीस निरीक्षक, सध्या नेमणूक - मध्य प्रादेशिक नियंत्रण कक्ष, भायखळ, मुंबई. रा. ठि. बी 203, [illegible] को. ऑ. हौ. सोसा. फेज - 2, वाडीरोड, मानपाडा, ठाणे (प)

खालील फिर्यादी श्री सुनिल ज्ञानेश्वर लांधी, वय ४० वर्षे, धंदा- नोकरी (पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि, मुंबई), रा.ठि. B-604, मोरया ॲवेन्यू, योगेश नगर, शांती मंदिराजवळ, नॅन्सी कॉलनी, बोरिवली (पू)- मुंबई- 400066 यांचा स्वतंत्र कागदावर संगणकीकृत केलेला जबाब हाच प्रथम खबर अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष,

(तेजस्विनी मोरे)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(सुनील लांधी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

फिर्याद दि. ०२/०७/२०२१

सुनिल ज्ञानेश्वर लांघी, वय–४० वर्षे, धंदा–नोकरी, पोलीस निरीक्षक, (एक टप्पा पदोन्नतीने), लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–४०० ०३०) यांची फिर्याद.

१. मी सुनिल ज्ञानेश्वर लांघी, माहे सप्टेंबर २०१९ पासुन एक टप्पा पदोन्नतीने पोलीस निरीक्षक या पदावर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे नेमणुकीस आहे.

२. **प्रकरणाची थोडक्यात हकिगत :–** आलोसे श्री. शंकर चन्नप्पा पुजारी, पोलीस निरीक्षक (सध्या पोलीस निरीक्षक, नेमणूक मध्य प्रादेशिक नियंत्रण कक्ष, भायखळा, मुंबई) यांचेविरूध्द दिनांक २३/११/२०१५ रोजी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीवरून दिनांक २४/११/२०१५ रोजी लोकसेवक यांनी अर्जदाराकडे त्यांचा क्लब चालु करण्यासाठी रू. ५०००/– मागणी करून ते स्विकारले, म्हणून ला.प्र. वि. गुन्हा नोंद क्र. ६६/१५ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७, १३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात येवुन दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर करण्यात आले.

२.१ सदर प्रकरणात गुन्हयाच्या तपासाच्या व परझडतीच्या अनुषंगाने वरिष्ठांनी १८/०३/१६ रोजी उघड चौकशी क्र. ११/१६ अन्वये पुढील चौकशी करण्याबाबत पोलीस निरीक्षक दहिफळे यांना आदेशीत केले. त्यानंतर सदरचे प्रकरण पोलीस निरीक्षक संभाजी साबळे यांना वर्ग करण्यात आले. त्यानंतर पो. नि. साबळे यांची बदली मुंबई शहर अशी झाली व सदरचे प्रकरण दिनांक २३/१०/२०१७ रोजी पोनि चंद्रसेन पालकर यांना वर्ग करण्यात येवुन सदर गुन्हयातील आलोसे शंकर चन्नप्पा पुजारी यांनी अपसंपदा संपादित केली आहे किंवा कसे? याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आलेले होते.

२.२ उपरोक्त नमुद उघड चौकशी क्र. ११/२०१६ ची चौकशी पो.नि. चंद्रसेन पालकर हे करीत होते. त्यांची अन्यत्र बदली झाल्याने कार्यालयीन आदेश जा.क्र. ९००२/लाप्रवि/बृमुवि/अपोआ/१९. दिनांक १७/०९/२०१९ अन्वये सदर प्रकरणाची पुढिल चौकशी माझेकडे वर्ग करण्यात आली. सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून **उघड चौकशी क्र. ११/२०१६** मध्ये खालील बाबी निष्पन्न झाल्या.

३. **लोकसेवक श्री. शंकर चन्नप्पा पुजारी यांची कौटूंबिक पार्श्वभूमी :–**

| | | |
|---|---|---|
| १ | गैरअर्जदार यांचे मुळ गांव | गडहिंग्लज, जि. कोल्हापुर |
| २ | गैरअर्जदार यांचे सध्याचे राहण्याचे ठिकाण | बी/२०१, शुभारंभ को. ऑ. हौ. सोसायटी लि. फेज २, वाडी रोड, मानपाडा, ठाणे पश्चिम |
| ३ | गै.अ. यांचे शिक्षण | एम.एस.सी. (कृषी), महात्मा फुले कृषी विदयापीठ, राहुरी, जि. अहमदनगर. |
| ४ | वडिलांचे नांव | श्री. चन्नप्पा कळ्ळाप्पा पुजारी |
| ५ | वडिलांचा व्यवसाय | मेंढपाळ व्यवसाय |
| ६ | गै.अ. यांना भाउ/बहिण | तिन भाउ, दोन बहिणी. |
| ७ | गै.अ. यांचे पत्नीचे नांव व व्यवसाय | सौ. बसम्मा शंकर पुजारी, गृहिणी. |
| ८ | गै.अ. यांच्या मुलांचे नांव | कु. सुचित्रा शंकर पुजारी.<br>कु. श्वेता शंकर पुजारी. |

३.१ लोकसेवक श्री. शंकर पुजारी यांचे वडिल श्री चनाप्पा कल्लाप्पा पुजारी, वय ८२ वर्षे हे मेंढपाळ व्यवसाय करतात.

३.२ लोकसेवक श्री. शंकर पुजारी यांना तिन भाउ आणि दोन बहिणी आहेत. त्यापैकी श्री. मारूती पुजारी आणि श्री. शिवाजी पुजारी हे त्यांचे गावी मेंढपाळ व्यवसाय करतात. डॉ. श्री. किशोर पुजारी हे राजस्थानमध्ये एका रूग्णालयात सी.ई.ओ. म्हणुन काम करतात. दोन बहिणी श्रीमती लक्ष्मी कल्लाप्पा दंडापुरे आणि श्रीमती यल्लवा रामाप्पा शेंडुरे या विवाहित आहेत.

३.३ लोकसेवक श्री. शंकर पुजारी यांचा विवाह दिनांक ०९/०८/१९९३ रोजी मौजा हरीहर, जि. दावणगिरी, कर्नाटक येथे सौ. बसम्मा संननिंगाप्पा येरेसिम्मी यांचे सोबत झाला आहे.

४. लोकसेवक श्री. शंकर पुजारी यांचा सेवा इतिहास :-

लोकसेवक श्री. शंकर पुजारी हे या महाराष्ट्र पोलीस दलात सन १९९२ साली पोलीस उपनिरीक्षक म्हणुन नियुक्त झाले असुन त्यांना सन २००४ मध्ये सहा. पोलीस निरीक्षक तर २००८ मध्ये पोलीस निरीक्षक म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे. त्यांचे कर्तव्याचा सेवा इतिहास पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | भरती | दिनांक १८/०८/१९९२ पासुन पोलीस उपनिरीक्षक म्हणुन भरती होवुन नाशिक येथे १ वर्ष प्रशिक्षण. |
| २ | ठाणे शहर | सन १९९३ ते २००४ ठाणे पोलीस आयुक्तालय येथे नोकरी. |
| ३ | | १) शांतीनगर पोलीस स्टेशन. |
| ४ | | २) भोईवाडा पोलीस स्टेशन. |
| ५ | | ३) कुंभारवाडा पोलीस स्टेशन |
| ६ | | ४) नारपोली पोलीस स्टेशन |
| ७ | | ५) निजामपुरा पोलीस स्टेशन |
| ८ | | ६) ठाणे बि.डी.डी.एस |
| ९ | मुंबई शहर | जुलै २००४ मध्ये मुंबई पोलीस आयुक्तालयात बदली. |
| १० | | १) मुलंड पोलीस स्टेशन. २००४ ते २००८ |
| ११ | | २) शिवाजी पार्क पोलीस स्टेशन. सन २००८ |
| १२ | | ३) पोलीस निरीक्षक म्हणुन पदोन्नती, संरक्षण व सुरक्षा शाखा, मुंबई ३१/१२/२००८ ते जुन २००९ |
| १३ | | ४) जुन २००९ मध्ये फोर्स वन मध्ये निवड. जुन २००९ ते जुन २०११ |
| १४ | | ५) वाहतुक शाखा. जुन २०११ ते जुन २०१४ |
| १५ | | ६) मुलुंड पोलीस स्टेशन. जुन २०१४ ते २४/११/२०१५ |

५. उघड चौकशी क्र. ११/२०१६ च्या अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई, बॅंका, शासकीय व खाजगी कार्यालये यांचेशी पत्रव्यवहार करुन आवश्यक ती माहिती व कागदोपत्री पुरावे प्राप्त करण्यात आले. तसेच लोकसेवक श्री. शंकर पुजारी यांनी आपली पहिली मालमत्ता सन २००० मध्ये घेतली आहे. त्यामुळे लोकसेवक श्री. शंकर पुजारी यांचा परिक्षण कालावधी **(Check Period)** हा दिनांक ०१/०१/२००० ते दिनांक २४/११/२०१५ असा ग्राह्य धरण्यात आला आहे.

समक्ष,

(वैशाली गोरडे)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(सुनील लांघी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

फिर्यादी श्री. सुनिल ज्ञानेश्वर लांधी यांचा दिनांक ०२/०७/२०२१ रोजीचा जबाब पुढे चालू..

५.१ उपरोक्त परिच्छेद क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या कालावधीत लोकसेवक श्री. शंकर पुजारी यांच्या स्थावर व जंगम मालमत्ता, उत्पन्न व खर्च यांचा तपशील पुढील प्रमाणे असल्याचे निष्पन्न झाले आहे.

गै.अ. लोकसेवक शंकर चन्नाप्पा पुजारी व त्यांची पत्नी सौ. बसम्मा पुजारी यांचे परिक्षण कालावधीतील मालमत्ता, उत्पन्न व खर्च.

(परिक्षण कालावधी दिनांक ०१/०१/२००० ते दिनांक २४/११/२०१५)

| क्र. | तपासाअंती मिळालेला तपशील | दिनांक | विधान 'अ' (परिक्षण कालावधी पूर्वीच्या मालमत्ता) | विधान 'ब' (परिक्षण कालावधी शेवटी असलेल्या मालमत्ता | विधान 'क' (परिक्षण कालावधीतील उत्पन्न) | विधान 'ड' (परिक्षण कालावधीतील खर्च) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वेतन :— भविष्य निर्वाह निधी, उत्पन्न कर,व इतर वजाती करून निव्वळ वेतन | २५/१०/२०१५ | — | — | ४८३९२३१ | — |
| २ | मालमत्ता :—गैरअर्जदार शंकर चनप्पा पुजारी यांचे वडीलोपार्जीत गडहिंग्लज येथील सी.स.नं. ११९०,११९१ मुळ घर नं. ४६७ मधील हिस्सा | २४/०६/२००५ | — | — | — | — |
| ३ | गैरअर्जदार शंकर चनप्पा पुजारी यांचे वडीलोपार्जीत गडहिंग्लज,शेंद्री रोड बडयाची वाडी एरीयातील प्लाट | २४/०६/२००५ | — | — | — | — |
| ४ | दि.२४/०६/२००५ गडहिंग्लज हबी बसवाना रोड येथील १५० चौ.मी.ची जागा वडीलोपार्जीत वाटणीपत्र | २४/०६/२००५ | — | — | — | — |
| ५ | गै.अ. शंकर चनप्पा पुजारी यांचे वडीलोपार्जीत २००० मेढयापैकी १/५ हिस्सा | २४/०६/२००५ | — | — | — | — |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | गै.अ. शंकर बनप्पा पुजारी यांचे वडीलोपार्जीत वाटणीपत्रातून फेडण्यासाठी आलेले कर्ज रू.३४००० | २४/०६/२००५ | — | — | — | — |
| ७ | गै.अ.शंकर पुजारी यांचे नावे असलेले बी.२०१, शुभारंभ कॉम्प्लेक्स, वाडी रोड,मानपाडा, ठाणे येथे दि. २१/१२/२००० रोजी खरेदी केलेले घर किंमत रू. ५५६,८९०/— त्यामध्ये पंजाब नॅशनल बॅंकेकडून घेतलेले कर्ज रू. ४,४५,०००/— उर्वरीत रक्कम रू.१,११,८९०/— मालमत्ता म्हणून दर्शविलेली आहे. | २१/१२/२००० | १११८९० | — | — | — |
| ८ | बी.२०१, शूभारंभ कॉम्प्लेक्स, वाडी रोड, मानपाडा, ठाणे येथील घरासाठी खर्च मुद्राक शुल्क रू. १७५७०/—नोंदणी फी रू.६४८५/— एकुण रू. २४०५५/— | २१/१२/२००० | — | — | — | २४०५५ |
| ९ | वाटणीपत्रादवारे वडिलोपार्जीत कर्ज रू. ३४०००/—परत केले | सन २००५ | — | — | — | ३४००० |
| १० | घर खरेदी करीता पंजाब नॅशनल बॅंक लोण खाते क्र. ३७३९०० एनसी ०००००५७२९ मधून कर्ज रू. ४५००००/ घेतले दिनांक दि.८/१०/१४ पर्यंत व्याजासह रू. ५६६२००/— अदा केले | दि. २५/१०/२००० ते दि ०८/१०/२०१४ | — | — | — | ५६६२०० |
| ११ | बी.२०१, शूभारंभ कॉम्प्लेक्स, वाडी रोड, मानपाडा, ठाणे घर खरेदी करीता जनकल्याण सहकारी बॅंकेकडुन घेतलेले कर्ज | १८/१०/२००० | — | — | ५०००० | — |
| १२ | बी.२०१, शूभारंभ कॉम्प्लेक्स, वाडी रोड,मानपाडा,ठाणे घर खरेदी करीता जनकल्याण सहकारी बॅंकेकडुन घेतलेले गृह कर्ज | १८/१०/२००० ते १४/११/२००९ | — | — | — | ६०१६४ |

समक्ष,

( वैशाली गोरडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(सुनील लोंधी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

फिर्यादी श्री. सुनिल ज्ञानेश्वर लांघी यांचा दिनांक ०२/०७/२०२१ रोजीचा जबाब पुढे चालु..

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | बी.२०१, शुभारंभ कॉम्प्लेक्स, वाडी रोड,मानपाडा,ठाणे येथील मेन्टनन्स खर्च | २१/१२/२००० ते २५/११/२०१५ | — | — | — | १७५८७३ |
| १४ | गै.अ. शंकर पुजारी यांचे नावे असलेले ए/६,फ्लट नं. ११०, तानाजी मालुसरे सीटी कर्जत मुळ खरेदी किमंत | दि. २३/९/२००८ ते दि. ११/०५/२०१५ | — | ४५२९०० | — | — |
| १५ | ए/६,फ्लट नं. ११०, तानाजी मालुसरे सीटी कर्जत येथील स्टॅम्प ड्युटी ४०९००/— नोंदणी फी रू.८१७० व हाताळणी फी रू. १७२०/— | — | — | — | — | ५०७९० |
| १६ | जनकल्याण बँक ठाणे शाखा खाते क. एस.बी.१०६२ मध्ये असलेली शिल्लक रक्कम | २५/११/१५ | — | १०९७१ | — | — |
| १७ | पंजाब नॅशनल बँक, खाते क. ७०६५१ मध्ये असलेली शिल्लक रक्कम | २५/११/१५ | — | २५९८ | — | — |
| १८ | एक्सीस बँक खाते क. ८०३२५ मध्ये असलेली शिल्लक रक्कम | २५/११/१५ | — | ५२८४५ | — | — |
| १९ | स्टेट बँक ऑफ म्हैसुर खाते क. २९५५१ मध्ये शिल्लक असलेली रक्कम | २५/११/१५ | — | ५५३ | — | — |
| २० | एल.आय.सी.मनी बँक पॉलीसी न.९२१०१६५९१ सन २००० ते जून १४ मध्ये गुंतविलेली रक्कम रू. १,५२,५३०/— | सन २००० ते जून २०१४ पर्यंत | — | १५२५३० | — | — |
| २१ | एल.आय.सी. मनी बँक पॉलीसी न. ९२१०१६५९१ या पॉलीसी मध्ये टप्प्याटप्याने मिळालेली रक्कम रू. १,६१,३०० | सन २००० ते जून २०१४ पर्यंत | — | — | १६१३०० | — |
| २२ | एल.आय.सी. पॉलीसी नं ९२०४८१४२० सन २००० ते नोव्हे १४ पर्यंत गुंतविले रू. ३३११०/— | सन २००० ते नोव्हे १४ | — | ३३११० | — | — |
| २३ | एल.आय.सी. पॉलीसी नं ९२०४८१४२० परिपक्व दि. २०/१०/१४ रोजी मिळाले १०६१५०/— | — | — | — | १०६१५० | — |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २४ | एल.आय.सी. पॉलीसी ९०२०४८१४२१ सन २०/१०/१९९४ मध्ये चालु केली अदयाप चालु आहे. सन २००० ते नोव्हे १५ पर्यंत भरलेले हप्ते रू. ८१९० परिपक्व सन २०२४ | — | — | ८१९० | — | — |
| २५ | ओला फॅमीली हेल्थ प्लॅन पॉलीशी क. २८२७०००२० ४७३/०००/०२ मध्ये गुंतविलेले रू. १०७५४/— १७ जुलै १३ ते जुलै १४ पर्यंत पत्नी नावे श्रीमती बसव्वा पुजारी यांचे नांवे | जुलै १३ ते जुलै १४ | — | १०७५४ | — | — |
| २६ | एल.आय.सी. पॉलीसी ९२११८४६७० दि. २०/७/२००० पासून नोव्हे. १५ पर्यंत भरलले हप्ते रू. ३५९५५/— | — | — | ३५९५५ | — | — |
| २७ | एल.आय.सी. पॉलीसी ९२३३०३२८८ ऑगस्ट — २००५ ते नोव्हें. २०१५ पर्यंत भरलेले हप्ते रू. ११०५०६/— | — | — | ११०५०६ | — | — |
| २८ | एल.आय.सी. पॉलीसी ९२३५५८७५२ दिनांक २०/१०/०६ ते नोव्हें. १५ पर्यंत भरलेले हप्ते. रू. ७४७९०० | — | — | ७४७९०० | — | — |
| २९ | एल.आय.सी. पॉलीसी नं ९२३५५८७५२ सन २००६ मध्ये काढण्यात आलेली होती. सदर पॉलीशीचे दि. २०/१०/१० रोजी १,५०,०००/— व दि. २०/१०/१४ रोजी १,५०,०००/— मुदतीअंती परत मिळाले. | — | — | — | ३००००० | |
| ३० | एल.आय.सी. पॉलीसी ९२१७३९५७७ दि. १५/१/९४ रोजी सुरू केली. सन २००० ते नोव्हें. १५ पर्यंत भरलेले हप्ते रू. ७९८३०/— | — | — | ७९८३० | — | — |

समक्ष,

( वैशाली गोरडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(सुनील लोंढी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१ | एलआयसी पॉलीसी नं ९२१७३९५७७ ही दि. १५/०१/९४ रोजी काढण्यात आलेली होती. सदर पॉलीसीचे दि. १५/०१/०४ रोजी १३,६३०/— व दि. १५/०१/०९ रोजी १५,०००/— तसेच दि. १५/०१/१४ रोजी १५,०००/— मुदतीअंती परत मिळाले. | — | — | | ४३६३० | |
| ३२ | मॅक्स लाईफ इन्शुरंन्स पॉलीसी क्र. ५९३६६९०१७ मध्ये रू. १५०००/— भरलेला हप्ता | — | — | १५००० | — | — |
| ३३ | मुलगी नामे सुनिता हिचा शिक्षणासाठीचा खर्च एकुण | सन २००० ते २५/११/१५ | — | — | — | ४३२६९९ |
| ३४ | मुलगी नामे श्वेता हिचा शिक्षणासाठीचा एकुण खर्च | सन २००४ ते २५/११/१५ | — | — | — | ३३६२८० |
| ३५ | बृहन्मुंबई पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. मुंबई येथून आकस्मीक कर्ज रू. १८०००/— घेतले | ०२/०७/२०१३ | — | — | १८००० | — |
| ३६ | बृहन्मुंबई पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. मुंबई येथून शैक्षणीक कर्ज रू. ४०००००/— घेतले | १२/०८/२०१३ | — | — | ४००००० | — |
| ३७ | बृहन्मुंबई पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. मुंबई येथून दि. २/७/१३ व दि. १२/८/१३ रोजी घेतलेले कर्ज दि. नोव्हे. ११ पर्यंत अदा केले. १३५६५४/— व व्याज रू. ७८३२८/— एकुण रू. २१३९८२/— | ०९/११/२०१५ | — | — | — | २१३९८२ |
| ३८ | वडिलोपार्जीत वाटणीपत्राद्वारे मिळालेल्या मेंढयाचे पालणपोषण व देखभाली करीता केलेला खर्च रू. १,४०,३००/— सबळ पुरावा नसल्याने सदरचा खर्च ग्राहय धरण्यात आला नाही. | दिनांक २४/०६/२००५ ते दि. २५/११/२०१५ पर्यंत | — | — | — | — |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३९ | लोकसेवक यांचे घरझडतीमध्ये घरात मिळालेली रक्कम रू. १९०१००० | २५/११/१५ | — | १९०१००० | — | — |
| ४० | घरझडती मध्ये मिळालेल्या घरगुती वस्तु व साहित्य | २५/११/१५ | — | ७४००० | — | — |
| ४१ | लोकसेवक पुजारी यांचेकडे असलेला सॅमसग कंपनीचा मोबाईल किंमत रू. २२०००/— | २४/११/१५ | — | २२००० | — | — |
| ४२ | लोकसेवक पुजारी यांचे परिक्षण कालावधीत १९१ महिन्याचे अदा केलेले बिल रू.३८२०० | १/१/२००० ते २४/११/१५ पर्यंत | — | — | — | ३८२०० |
| ४३ | लोकसेवक पुजारी यांची पत्नी नामे बसव्वा पुजारी ही मानसिक रूग्ण असल्याने त्यांचे औषधोपचारासाठी झालेला खर्च रू. १००००० | २४/११/१५ पर्यंत | — | — | — | १००००० |
| ४४ | पत्नी व मुलगी नामे सुचित्रा यांचा मोबाईल हॅंडसेटसाठी व बिल अदा करण्यासाठी परिक्षण कालावधीत केलेला खर्च रू. ४०,००० | २४/११/१५ पर्यंत | — | — | — | ४०००० |
| ४५ | पत्नी सौ. बसव्वा व मुलीसह तिरूपती बालाजी व दक्षिण भारतात देवदर्शन व पर्यटनासाठी आलेला खर्च रू. ४००००/— | सप्टेंबर २०१२ | — | — | — | ४०००० |
| ४६ | परिक्षण कालावधीत लोकसेवक पुजारी यांच्या वेतनातून मिळालेल्या स्थूल उत्पन्नातुन इनकम टॅक्स वजा करून रकमेवर १/३ नाशाबीतीचा खर्च (स्थुल वेतन—५९२९३३६—२३४७ ५६ =५६९४५८०) | २५/११/१५ | — | — | — | १८९८१९३ |
| | एकुण | | १११८९० | ३७९०६४२ | ५९९८३११ | ४०१०४३६ |

६. लोकसेवक श्री. शंकर पुजारी यांचे नाकारण्यात आलेले उत्पन्न :—

| | | |
|---|---|---|
| ६.१ | नातेवाईक रामण्णा शेडुरे यांचेकडून बिनव्याजी घेतलेले कर्ज दिनांक २५/१०/२००० रोजी रुपये ६०,०००/— | दिनांक २५/१०/२००० रोजी बी.२०१, शुभारंभ कॉम्प्लेक्स, वाडी रोड,मानपाडा,ठाणे घर खरेदी करीता नातेवाईक रामण्णा रायप्पा शेडुरे यांचेकडुन बिनव्याजी कर्ज घेतले होते. सदर कर्ज घेतलेबाबत श्री शेडुरे |

समक्ष,

( वैशाली गोरडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(सुनील लोखंडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

| | | |
|---|---|---|
| | | यांना जबाबासाठी बोलाविले असता ते उपस्थित राहिलेले नाहीत. तसेच लोकसेवक पुजारी यांनी आयकर विभागास सुध्दा बिनव्याज कर्ज घेतलेबाबत कळविले नाही. परिणामी तुर्तास सदरचे कर्ज नाकारण्यात येत आहे. |
| ६.२ | गै.अ.शंकर पुजारी यांनी कर्जत येथील फ्लॅटकरीता रू. २,०७,९००/— बकरी विक्री मधून मिळालेबाबत | लोकसेवक श्री पुजारी यांनी त्यांचे जबाबात नमुद केले की, त्यांनी कर्जत येथील घेतलेल्या मालमत्तेकरीता जी रक्कम उभी केली. त्यामध्ये वडिलोपार्जीत मेंढया विकीतून आलेली रक्कम रू. २,०७,९००/— खर्च केली आहे. परंतु शेळया मेंढया विकीतून प्राप्त झालेली रक्कमेबाबत कोणताही सबळ पुरावा नसल्याने तसेच गैरअर्जदार यांनी मत्ता व दायित्व अथवा आयकर परताव्या मध्ये सदरचे उत्पन्न दर्शविलेले नसल्याने सदरचे उत्पन्न नाकारण्यात आलेले आहे. उत्पन्न कॉलम मध्ये सदरचे उत्पन्न नाकारण्यात येत आहे. |
| ६.३ | वडिलोपार्जीत वाटणीपत्राद्वारे मिळालेल्या मेंढयाची विक्री करून मिळालेली रोख रक्कम रू. १९,०१,०००/— | लोकसेवक पुजारी यांचे घरझडती दरम्यान रोख रूपये १९,०१,०००/— इतकी रोख रक्कम मिळून आलेली होती. सदरची रक्कम ही लोकसेवक यांचे वडिलोपार्जीत मेंढपाळाचे व्यवसायातून आलेली आहे. आलोसे यांचे वडिलांनी त्यांचे मुलाना वाटणीपत्राद्वारे एकुण २०००/— मेंढयापैकी लोकसेवक यांचे वाटणीला आलेल्या मेंढया विकी पासून सदरची रक्कम मिळालेबाबत मेंढया विकीच्या पावत्या सादर केलेल्या आहेत. सदरच्या मेंढया हया त्यांचे भाउ हे संभाळत होते. सदर उत्पन्नाबाबत कोणताही सबळ पुरावा लोकसेवक यांनी दिलेला नाही, तसेच मत्ता व दायित्व विवरणपत्र व आयकर विभागास सदरचे उत्पन्न दर्शविलेले नाही, म्हणून सदरचे उत्पन्न ग्राहय धरण्यात आलेले नाही. |

७. उपरोक्त परिच्छेद कमांक ५.१ आणि ६ मधील तपशीलावरुन लोकसेवक शंकर पुजारी यांच्या संपदेची गणना केली असता ती खालील नमुद तक्त्याप्रमाणे दिसून येते.

| अ.क्र | तपशिल | | रुपये |
|---|---|---|---|
| १ | दिनांक २५/१०/२०१५ पर्यंत असलेली मालमत्ता (विधान—ब) | :— | ३७,१०,६४२ |
| २ | दि. ०१/०१/२००० रोजी असलेली मालमत्ता (विधान — अ) | :— | १,११,८९० |
| ३ | परिक्षण कालावधीतील एकूण मालमत्ता ( ब—अ) | :— | ३५,९८,७५२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | परिक्षण कालावधीतील एकूण खर्च (विधान--ड) | :-- | ४०,१०,४३६ |
| ५ | परिक्षण कालावधीतील एकूण मालमत्ता व खर्च (३ + ४) | :-- | ७६,०९,१८८ |
| ६ | परिक्षण कालावधीतील एकूण उत्पन्न (विधान--क) | :-- | ५९,१८,३११ |
| ७ | अपसंपदा ( ५--६ ) डी.ए. | :-- | १६,९०,८७७ |
| ८ | अपसंपदेची टक्केवारी DA X १०० / (Total Income) | :-- | २८.५७ टक्के |

८. उपरोक्त परिच्छेद क्र. ५.२ मध्ये नमुद तक्त्यानुसार लोकसेवक शंकर पुजारी यांनी त्यांचे परिक्षण कालावधीमध्ये रुपये १६,९०,८७७/-- (२८.५७ %) एवढी अपसंपदा संपादित केली आहे. त्याची टक्केवारी खालीलप्रमाणे काढली आहे.

$$\frac{१६,९०,८७७ \times १००}{५९,१८,३११} = २८.५७ \%$$

९. अशा प्रकारे श्री. शंकर पुजारी यांनी उपरोक्त परिच्छेद क्रमांक ५.२ अन्वये स्वतःच्या नावे रक्कम रू. १६,९०,८७७/-- येवढी अपसंपदा बाळगली असल्याचे निष्पन्न झाले आहे. अपसंपादीत मालमत्ता ही त्यांचे ज्ञात उत्पन्नापेक्षा २८.५७ % अधिक असल्याचे उघड चौकशीत सिध्द झाले आहे. चौकशीमध्ये लोकसेवक श्री. शंकर पुजारी यांच्या दिनांक ०१/०१/२००० ते दिनांक २४/११/२०१५ या सेवाकालावधीत त्यांच्या ज्ञात व कायदेशीर उत्पन्नापेक्षा विसंगत अशी एकूण रू. १६,९०,८७७/-- (२८.५७ %) येवढी जास्त अपसंपदा बाळगल्याबाबत ते समाधानकारक खुलासा सादर करून शकल्या नाहीत म्हणून माझी त्यांचे विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे सरकार तर्फे फिर्याद आहे.

समक्ष,

(वैशाली गोरडे)
सहायक पोलीस आयुक्त
लाप्रवि, मुंबई

(सुनील ज्ञानेश्वर लांभी)
पोलीस निरीक्षक
लाप्रवि, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ....... त्वरित

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

यातील आलेले शंकर धनाप्पा पुजारी (पोलीस निरीक्षक) यांनी त्यांच्या दि. ०१/०२/२००० ते दि: २४/०१/२०१५ या सेवा कालावधीत त्यांच्या ज्ञात व कायदेशीर उत्पन्नापेक्षा विवरण करुन २८.५६% इतकी जास्त अपसंपदा मालमत्ता म्हणून नमुद आल्याने यांचे विरुद्ध भ्र.प्र. अधिनियम - १९८८ चे कलम १३(१)(ई) सह १३(२) अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

श्रीमती वैशाली गोरडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, ला.प्र.वि., मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the investigation or Directed (Name of I.O.) ...... Rank ...... No ......
to take up the Investigation or

(2) Refused investigation due to ...... (3) Transferred to P.S. ......
District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant

Gorde 02/07/2021

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name वैशाली उमेश गोरडे
पदनाम Rank सहाय्यक पोलीस आयुक्त,
तपासिक अं. चा कोड क्र. लाप्रवि, मुंबई
Posting
Code No. of I.O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ......
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**